Historicity Research Journal
Volume 2 | Issue 9 | May 2016

Impact Factor : 0.4521 (UIF)
ISSN:- 2393-8900

**Research Article**

# शिवाजी महाराजांच्या आरमारातील मुस्लिम अधिकारी

**रविन्द्र मुन्द्रे**

विभाग प्रमुख, इतिहास विभाग ,
श्रीमती राधादेवी गोयनका महिला महाविद्यालय, अकोला (महाराष्ट्र)

**Abstract :-**

महाराष्ट्राला इतरांच्या मानाने विपुल सागरी किनारा मिळाला होता. परंतु एतद्देशीय राजांनी सागरी सत्तेचा उपयोग करून घ्यावा अशी त्यांच्याकडे दृष्टी नव्हती. तसेच सागरी सत्तांशी सामना करण्याची महाराष्ट्रात अनुकूल परिस्थितीही नव्हती. फ्रेंच, डच, इंग्रज, पोर्तुगीज या परकीय शक्ती हळूहळू सागरावर आपली सत्ता प्रस्थापित करण्याच्या दृष्टीने हालचाली करीत होत्या. या हालचाली स्वराज्यास पुढे महागात पडणार आहेत हे शिवाजी महाराजांच्या दूरदर्शी स्वभावाने ओळखले. त्यांच्या या दूरदर्शी स्वभावानेच भविष्यातील धोक्याची जाणीव त्यांना करून दिली. परंतु यावर उपाययोजना करण्यासाठी धर्म आडवा येत होता. धार्मिक विधीनिषेधाच्या कल्पनेमुळे महाराष्ट्रीयनांना सागराकडे ओढा घेता आला नाही. कारण धर्माप्रमाणे सागर उल्लंघन म्हणजे धर्माज्ञेचा भंग ! शिवाजी महाराजांनी या स्वराज्यासाठी घातकी रूढीचा प्रखर विरोध करून प्रबळ आरमार उभे केले.

शिवाजी महाराजांनी आरमारात पराक्रमी व धाडसी मुस्लिम अधिकाऱ्यांची नेमणूक करून सशक्त आरमाराची निर्मिती केली. यामध्ये दर्यासारंग, इब्राहिमखान, सिद्दी मिस्त्री, दाऊदखान, दौलतखान, सुलतानखान इ. अनेक मुस्लिम अधिकारी होते. शिवाजींच्या आरमाराने तत्कालीन इंग्रज, पोर्तुगीज, डच, सिद्दी यांच्या तोंडचे पाणी पळविले होते. महाराजांनी बलाढ्य व सशक्त आरमाराची निर्मिती केली होती म्हणून त्यांना 'Father of Indian Navy' असे म्हटले जाते.

**Keywords :-** मराठा आरमार, दर्यासारंग, दौलतखान.

**प्रस्तावना :-**

विश्वाच्या इतिहासाने दखल घ्यावी एवढे असामान्य नेतृत्व लष्करी संघटनेच्या बाबतीत शिवाजी महाराजांच्या अंगी होते. आरमाराची पायाभरणी हे शिवरायांच्या दूरदर्शी नेतृत्वाचे एक फळ म्हणता येईल. 'ज्याचे आरमार त्याचा समुद्र' हे आज्ञा पत्राच्या शेवटच्या प्रकरणातील प्रारंभीचे वाक्य या कार्याच्या मुळाशी असलेली प्रेरणा स्पष्ट करणारे आहे. प्राचीन कालखंड वगळला तर मध्ययुगात आरमार आणि सागरी व्यापार यांची भारतीय परंपरा खंडीत झाली होती असे दिसून येते. पाश्चिमात्य राष्ट्रांचा या देशाशी सागरी व्यापार सुरू होईपर्यंत किनाऱ्यावर राज्य करणारे राजे राजवाडे स्वत:ची जहाजे व नौका बाळगीत असत. परंतु माल वाहतूक व आरमारी सामर्थ्याच्या दृष्टीने या साधनांनी फारसा पल्ला गाठला होता असे इतिहास सांगत नाही. मुसलमानी आक्रमणानंतरच्या काळात विजयनगर, आदिलशाही आणि मोगल (गुजरातची किनारपट्टी) या सत्तांनी लहान-मोठ्या प्रमाणा लढाऊ व मालवाहू जहाजे बाळगली होती. परंतु व्यापार व राज्य विस्तार यांच्या दृष्टीने या साधनांचा उपरोक्त सत्तांनी फारसा उपयोग करून घेतला होता असे आढळून येत नाही.

१५ व्या, १६ व्या शतकाच्या सुमारास पोर्तुगीज, डच, फ्रेंच व इंग्रज व्यापाराच्या निमित्ताने या देशाच्या किनाऱ्यावर उतरले. या परराष्ट्रीयांनी आपला व्यापार व वखारी यांच्या संरक्षणार्थ थोडेफार आरमारही बाळगले होते. अगदी प्रारंभापासून या देशात पुढे मागे राज्य स्थापावयाचे हे धोरण या परराष्ट्रीयांचे होते. हे धोरण स्वराज्याची स्थापना होईपर्यंत एकाही देशी सत्तेला ओळखता आले नाही. व्यापाऱ्यांचा कावा या देशात प्रथम ओळखला तो शिवाजी महाराजांनी देशाच्या स्वातंत्र्यास समुद्रमार्गाने लागलेले ग्रहण आणि परराष्ट्रीय आक्रमकांना आपल्या हेतूच्या पूर्तीसाठी योजलेले आरमारी बळ या बाबी दिव्यदृष्टी असलेल्या राष्ट्रपुरूषाच्या ध्यानी आल्या नसत्या तर नवलाचे वाटले असते. हिंदवी स्वराज्याचे स्वप्न साकार करण्यास बुद्धपरिकर असलेल्या शिवाजी महाराजांना स्वातंत्र्यास असलेला धोका स्पष्ट दिसत होता म्हणूनच अनुकूल काळ येताच त्यांनी स्वत:चे आरमार बांधण्यास व त्याचा विस्तार करण्यास प्रारंभ केला.

उत्तर कोंकणावर शिवाजी महाराजांनी प्रभुत्व मिळविले होते. तथापि, सिद्दीच्या ताब्यात असलेल्या किनाऱ्यालगतचा भाग व जंजिरा आणि पोर्तुगीजांच्या ताब्यात असलेला किनारी पट्टा हे स्वराज्याला कायम आवाहन होते. सुमारे ३०० मैलांवर किनाऱ्याने पसरलेल्या

स्वराज्याचे संरक्षण आणि बंदोबस्त करायचा असेल तर आरमार उभारणे आवश्यक होते. संरक्षणाची ही निकड लक्षात घेऊन शिवाजी महाराजांनी आरमार उभारण्यास प्रारंभ केला.

शिवाजी महाराजांनी आरमारात सुद्धा मुस्लिमांना महत्त्वाचे स्थान दिले होते. बरेचसे मुस्लिम अधिकारी शिवाजी महाराजांच्या आरमारात होते. त्यात दर्यासारंग हे पद मुस्लिमांसाठी होते. "गुराबा व तरांडे ताखे, गलबते, शिवाडे, पगार अशी नाना जातीची जहाजे करून दर्यासारंग म्हणोन मुसलमान सुभेदार व मायनाक म्हणोन भंडारी असे दोघे सुभेदार करून जहाजे एक सुभा असे आरमार सजले."[१]

"समुद्रात सत्ता करावी म्हणून बहुत चित्तात हेतू धरून आरमार करावे बेत करून जहाजे सजविली. नवी तयार करविली त्यांची नावे गुराबा, तरांडी, गल्बती, मुबारे, पगार, शिबाडे, मचवे, भोर तिरकती पाल असे नाना जातीचे चारपाचशे तयार करविली. त्यातस दहापाच लक्ष रूपये खर्च केला. त्याजवरी सरदार दर्यासारंग, मायनाक वगैरे सुभेदारी देऊन तोफा वगैरे सामान दर्यावर्दी लोक लढावू व कोळी व खालची देवून ठेविली."[२]

आरमारात सर्व जाती-धर्माच्या लोकांना त्यांच्या गुणवत्तेनुसार कार्य दिले होते. शिवाजी महाराजांचा मुस्लिमांवर विश्वास असल्यामुळे अनेक उच्च पदे त्यांच्याकडे सोपविली. दौलतखान, इब्राहिमखान, सिद्दी मिस्त्री, दाऊदखान, सुलतानखान इ. अनेक मुस्लिम अधिकारी त्यांच्या आरमारात होते.

**मुस्लिमांना उच्चपदे**

स्वराज्यात अनेक मुस्लिम अधिकारी होते. त्याचबरोबर आरमारासाठी योग्य असणाऱ्यांची नियुक्ती आरमारात करण्यात आली. स्वराज्यातील बहुतेक मुस्लिम सरदार नावीक दलाच्या कसोटीला उतरून त्यांना महत्त्वाच्या जागांवर नेमण्यात आले. जहाजावरील तोफखान्यातील गोलंदाजांपासून ते आरमाराच्या सर्वोच्च अधिकारी सुभेदारापर्यंत अनेक मुस्लिमांना शिवाजीने अधिकारी म्हणून नियुक्त केले होते. "शिवाजीच्या वेळी आरमाराचे वरिष्ठ अधिकारी आणि सागरी किल्ल्याचे प्रमुख हे सर्व मुस्लिम होते."[३]

"Each squadren was placed under the suprime command of an Admiral Dariya Sarang, Mohamadan officer, Dariya Sarang was not only Mohamadan officer in Shivaji's fleet, another prominent Mohamadan Admiral Daulat Khan by name entered Shivaji's service."[४]

"Atlist three I his naval commanders were muslims by faith"[५]

शिवाजी महाराजांचा पोर्तुगीज समकालीन चरित्रलेखक कॉस्मा डा गार्डा हा A Vida E Accoes Do Famso E Felecissimo Sevahi या शिवाजीच्या चरित्रग्रंथात म्हणतो की, "Most of the Captains of Sevaji's fleet were Muslims"[६] वरील सर्व पुराव्यावरून स्पष्ट दिसून येते की, शिवाजी महाराजांनी आरमारातील उच्च पदे मुस्लिमांना दिली होती. या निवडीसाठी जी कसोटी ठरविण्यात आली होती, त्यास मुस्लिम सरस ठरले. कारण हिंदू आपल्या रूढीपरंपरा पाळून होते आणि रूढीपरंपरेनुसार सागर उल्लंघन म्हणजे धर्मद्रोह होत असे. तरीपण शिवाजी महाराजांनी हे धर्मद्रोह करण्याचं धाडस केलं आणि आरमाराची उभारणी करून ज्यांना आरमारात ज्या जागा द्यायच्या त्या योग्यतेप्रमाणे दिल्या. आपल्या राजानंच जर धर्माला बाजूला ठेवलं तर आपणही त्याचं अनुकरण करायला पाहिजे असे काही बुद्धिवादी हिंदूंना वाटलं. म्हणूनच भंडारी, कोळी यासारख्या हिंदूंनी सुद्धा आरमारात भाग घेतला.

मुस्लिमांना उच्चपदे देऊन शिवाजी महाराजांनी आरमारात सुद्धा आपल्या विश्वासू माणसांचा भरणा केला. कारण शिवाजी महाराजांचा मुस्लिमांवर खूप विश्वास असल्यामुळे आणि मुस्लिम आपले कार्य कर्तव्यबुद्धीने पार पाडत होते. त्यामुळे आरमाराची जबाबदारी सुद्धा मुस्लिमांवर टाकण्यात आली. हे आरमारातील मुस्लिम सरदार आपले जातभाई सिद्दीशी लढत होते.

**आरमाराची पहिली स्वारी - बसनूर**

बसनूर (बार्सिलोर) हे दक्षिणेतील महत्त्वाचे व्यापारी ठाणे होते. तेथील शिवाप्पा नाईक जंगम हा फार धनाढ्य होता. शिवाजीने त्यास पत्र लिहून कळविले की, आम्हास खंडणी देत जाणे, त्याबद्दल आम्ही आपल्या शहराचे रक्षणाची हमी घेतो. बोलणीसाठी आपणाकडे वकील पाठवितो. तेव्हा शिवाजी महाराजांच्या या पत्राला शिवाप्पा नाईक जंगमाने उद्धटपणे निरोप पाठविला की, तुमच्यात सामर्थ्य असेल तर यावे आणि खंडणी वसूल करावी. शिवाजी महाराजांच्या पराक्रमाबद्दल शिवाप्पा नाईक साशंक होता त्याला महाराजांच्या आरमाराची सुद्धा कल्पना नव्हती. स्वतः धनाढ्य असल्यामुळे तो अहंकारी वृत्तीचा होता. शिवाजी महाराजांनी त्याला धडा शिकवायचे ठरविले. त्याचबरोबर बसनूरच्या किनाऱ्यावर असलेल्या पोर्तुगीज व्यापाऱ्यांनाही वचक बसावा, असा दुहेरी उद्देश शिवाजी महाराजांचा होता. कारण ही आरमारी पहिली मोहिम असल्यामुळे पोर्तुगीजांना सुद्धा आपल्या आरमाराची ओळख व्हावी आणि शिवाजीने निर्माण केलेले आरमार किती सशक्त आहे याची जाणीव पोर्तुगीजांना व्हावी हा उद्देश सुद्धा या मोहिमेमागे होता. योजनाबद्धरितीने त्यांनी मोहिमेची सुरूवात केली. समुद्रात उभारलेल्या आपल्या आरमारास त्यांनी सज्ज राहण्याचा इशारा दिला. सर्व युद्धतयारी झाल्यावर अचानक एके दिवशी दिवस उजाडण्यापूर्वीच महाराजांनी बसनूरवर हल्ला चढविला. शिवाप्पा नाईकास याची काहीच खबर नव्हती. संपूर्ण शहर झोपेत होते. अचानक झालेल्या हल्ल्यामुळे ते अतिशय घाबरून गेले आणि योग्य प्रतिकारही करू शकले नाहीत. संपूर्ण दिवसभर शहराची लूट केली, अगणित माल, जडजवाहीर, कापड, जिन्नस घेऊन शिवाजी आपल्या नाविक दलासह परत फिरले. वाटेत येतांना गोकर्ण बंदरलाही त्यांनी लुटले. जेथे शकावलीप्रमाणे ही घटना ७ जानेवारी ते ५ फेब्रुवारीच्या दरम्यान १६६५ मध्ये घडली. या संदर्भात कारवारकराचे १४ मार्च १६६५ चे पत्र उपलब्ध आहे ते असे, "फेब्रुवारी आरंभी ८५ लहान व ३ मोठी जहाजे घेऊन शिवाजी मालवणातून बाहेर पडला. तो गोव्यातून काहीही न झाल्याशिवाय बार्सिलोर (बसनूर) जाऊन ते बंदर लुटून गोकर्णाला परत आला."[७]

बसनूरची ही स्वारी शिवाजी महाराजांच्या आरमाराची पहिलीच स्वारी होती. पहिल्याच स्वारीत अचाट पराक्रम शिवाजी महाराज आणि त्यांच्या आरमाराने करवून दाखविला होता. आरमारात सहभागी असलेले पराक्रमी मुस्लिम सरदार हे सुद्धा आपल्या पराक्रमाने आनंदित झाले होते. शिवाजी महाराजांनी आरमारातील सैनिकांचा पराक्रम आपल्या डोळयाने पाहिला होता. दर्यासारंग, दौलतखान, सिद्दी मिस्त्री हे मुसलमान सरदार पराक्रमाची शर्थ करून लढले होते. बसनूरच्या या स्वारीने पोर्तुगीज व्यापारांमध्ये सुद्धा दहशत निर्माण झाली आणि मराठ्यांचे आरमार किती सशक्त आहे याची प्रचिती सर्व सागरी सत्तांना झाली. आरमाराची ही पहिलीच स्वारी पण अपेक्षेपेक्षा यशस्वी झाली होती.

**दर्यासारंग व इंग्रज**

मराठी आरमारातील दर्यासारंग हा मुस्लिम अधिकारी इंग्रजांना सळो की पळो करून सोडत होता. आपल्या पराक्रमाने त्याने इंग्रजाला पाणी पाजले होते. जंजिरा सर करण्याच्या मार्गातील अनंत अडचणी लक्षात घेता शिवाजी महाराजांनी जंजिराच्या जवळच्याच एखाद्या बेटावर आपला नाविक तळ उभारण्याचा निश्चय केला. त्या दृष्टीने त्यांना खांदेरी बेटाची निवड केली. खांदेरी हे बेट १$^{१}/^{२}$ x $^{१}/_{२}$ मैल लांबरूंद असून मुंबईपासून काही अंतरावर आहे. शिवाजी महाराजांनी खांदेरीवर १६७९ च्या ऑगस्ट महिन्यात तटबंदीचे काम चालू केले. ही वार्ता मुंबईच्या डेप्युटी गव्हर्नरला कळताच त्याने ते बेट सोडण्यास फर्मावले. शिवाजीने त्याकडे दुर्लक्ष करून बांधकाम सुरूच ठेवले. खांदेरी बेट ताबडतोब सोडा नाहीतर ते कृत्य शत्रुत्वाचे समजून त्यास प्रतिबंध करू, या धमकीला शिवाजीचा आरमार प्रमुख दर्यासारंगने भीक घातली नाही. तेव्हा युद्धास तोंड फुटले. फ्रान्सिस थार्ज व आणखी दोघा इंग्रज अधिकाऱ्यांनी खांदेरीवर उतरण्याचा प्रयत्न केला, परंतु ते तिघेही दर्यासारंग कडून मारले गेले, तेव्हा इंग्रजांनी आपली १२ जहाजे खांदेरी बेटासमोर उभी करून लढाईची सिद्धता केली.

"११ ऑक्टोबर १६७९ रोजी दिवस उजाडण्यापूर्वीच मराठा आरमाराचा सुभेदार दर्यासारंगने त्या १२ जहाजांवर हल्ला चढविला, अचानक झालेल्या हल्ल्यामुळे सर्व इंग्रज अधिकारी गोंधळून गेले. दर्यासारंगचे सहकारी मायनाक, दौलतखान व सिद्दी मिस्त्री यांनी इंग्रजांची ५ जहाजे बुडविली. इंग्रजांचे 'डोव्हर' नावाचे जहाज त्यांनी पकडून त्यावर स्वराज्याचे निशाण लावले. इंग्रजांच्या Revenge नावाच्या जहाजाने मात्र शेवटपर्यंत प्रतिकार केला."[८] दर्यासारंगने आपल्या पराक्रमाने इंग्रजांचा जबरदस्त पराभव करून त्यांना पाणी पाजले. मराठा आरमाराच्या भीतीने गर्भगळीत झालेला Revenge या जहाजावरील इंग्रज अधिकारी जॉर्ज कोल हा आपल्या वरिष्ठ अधिकाऱ्यास रिपोर्ट करतो. "I am now in a conditioon not able to defend myself if an enemy should approach, humably desiring your warship to dispatch all speed fresh recruits or your further orders."[९]

नोव्हेंबरच्या अखेरीस पुन्हा युद्धास सुरूवात झाली. जंजिऱ्याचा सिद्दी आपली ३४ जहाजे घेऊन इंग्रजांच्या मदतीला आला. इब्राहिमखान आणि दौलतखानाने हा हल्ला परतवून लावला. इंग्रज खांदेरीच्या तटबंदी बांधकामात अडथळे आणतात, हे पाहून शिवाजी महाराजांनी राजापुरातील इंग्रज व्यापाऱ्यांना कैद करून त्यांचा माल जप्त केला, तसेच त्यांना दिलेल्या व्यापारी सवलतीही काढून घेतल्या. मराठा आरमाराचा जबर दणका, शिवाजीने कैद केलेले व्यापारी आणि काढून घेतलेल्या व्यापारी सवलती यामुळे इंग्रज अडचणीत सापडले. हा लढा त्यांना फार महागात पडणार, हे सर्व पाहून इंग्रजांच्या सुरत कौन्सीलने जानेवारी १६८० मध्ये या लढ्यातून माघार घेण्याचा ठराव घेतला, तसेच आपली जहाजे खांदेरीतून काढून घेऊन त्यांनी शिवाजी महाराजांशी तह केला. जंजिऱ्याच्या सिद्दीला कोणत्याही प्रकारे मदत न करण्याचे कलम या तहात प्रामुख्याने टाकण्यात आले.

मराठा आरमाराचा शेवटी विजय झाला. सुभेदार दर्यासारंगच्या जहाजांनी इंग्रजांचा पराभव करून त्यांच्यात मराठा आरमाराविषयी दहशत निर्माण केली. मायनाक, इब्राहिमखान, दौलतखान या सहकाऱ्यांनी सुद्धा पराक्रमाची शर्थ केली. शिवाजी महाराजांनी या लढ्यात ज्यांनी मर्दुमकी गाजविली त्यांना बक्षिसे दिली त्यांचा सन्मान केला. आपल्या माणसांच्या पराक्रमाचे त्यांनी कौतूक केले, या संदर्भात मुंबईहून कंपनीस लिहिलेले पत्र नमुन्यादाखल पाहता येईल. "We have been for several days hoatly all around that sevagee Rajah had certain intention to attempt the burning siddy fleet at Mazagon... to which purpose he some months since sent for Daulat caun & Dearia Sarung both Generals of his fleet at sea & after praised them their good service and given them several Tusheraffs."[१०]

शिवाजी महाराजांनी आरमारावर ज्या मुस्लिम अधिकाऱ्यांची नेमणूक केली होती त्यांच्यात राष्ट्रप्रेमाची आणि राज्यनिष्ठेची भावना ठासून भरली होती. म्हणूनच कोणत्याही परकीय सत्तांशी लढतांना आरमारातील अधिकारी विजयाच्या अपेक्षेनेच लढत असत आणि परकीय सत्तांचा धुव्वा उडवीत होते. दर्यासारंगचा पराक्रम म्हणजे इंग्रजांवर मराठ्यांचे वर्चस्व निर्माण होणे होते. इंग्रजांच्या आधुनिक तंत्रज्ञानाला आणि पाश्चात्य धर्तीच्या सैनिकांचा फज्जा उडवून सागरावरील आपलं श्रेष्ठत्व या पराक्रमाने दर्यासारंगने सिद्ध करून दाखविले होते. शिवाजी महाराजांची माणसे पारखण्याची दृष्टी या ठिकाणी सुद्धा यशस्वी ठरली. ज्यांना जे कार्य दिल्या गेले होते ते त्याने राष्ट्रीय कार्य समजून प्रामाणिकपणे पार पाडले होते. शिवाजी महाराजांचे आरमार जे अनेक वर्षेपर्यंत आपलं वर्चस्व सागरावर गाजवून होते ते सर्व कर्तव्यदक्ष आणि पराक्रमी मुस्लिम अधिकाऱ्यांनी निर्माण केलेले होते.

**पराक्रमी दौलतखान**

शिवाजी महाराजांच्या आरमारातील आणखी एक पराक्रमी मुस्लिम सुभेदार दौलतखान होता. मार्च १६७४ मध्ये सिद्दी संबुळने दौलतखानावर स्वारी केली. तेव्हा तो मराठा आरमाराचा प्रमुख होता. यावेळी सिद्दीचा पराभव झाल्याने तो हरिद्वारला पळाला. मात्र दौलतखानाला युद्धात बऱ्याच जखमा झाल्या. सिद्दी कासीम हा मुंबईस असल्याने त्याने जमीन व पाणी अशा दोन्ही बाजूंनी दौलतखानावर

हल्ला चढविला. मात्र शेवटी त्याला अपयश येऊन माघार घ्यावी लागली. या संदर्भात मिळालेल्या नारायण शेणवी या ब्रिटिश प्रतिनिधीच्या पत्रावरून दौलतखानाच्या पराक्रमाची कल्पना येते. ते पत्र असे -

"...I have heard I Shiddi Sombole in a few words. He engaged with Daultkhan, navy in satonly rive. Where there was glain about one hundred man of Siddy and forty four of Daulatkhan's who gain the victory but is wounded with an arrow, his hand burnt."[११]

दौलतखानाच्या पराक्रमाची माहिती आपल्याला यावरून कळून येते.

दौलतखानाने उंदेरी बेटावर २६ जानेवारी १६८० रोजी हल्ला केला. सिद्दीच्या प्रचंड ताकदीपुढे दौलतखानाला लढा द्यायला बराच त्रास झाला, सिद्दीच्या अनेक सैनिकांबरोबर दौलतखानाचेही अनेक सैनिक जखमी झाले व मृत्यु पावले. दौलतखानाची उंदेरी हल्ल्याच्या संदर्भात सुरतच्या नोंदीमधून खालील माहिती मिळते.

"Doulettcaun come out with all vessels assaulting Hendery in three places and had, 3000 men to land but the Siddy beat him off with the loss of four men and seven wounded. But the news from Chaul is that Daulattcaun hath received great damage, hath killed outright 200 men and about 100 more wounded and hath lost seven vessels. Shivagee's people have brought a gun to till that reacheth to hendery but hath done the Soddy noe great harme and the Siddy was guns the reacheth to the maine which killed several."[१२]

सिद्दीशी मराठा आरमाराला लढतांना त्यांच्या मनात मुस्लिम आपुलकीची भावना निर्माण झाली नाही. सिद्दी हा मराठ्यांचा प्रथम क्रमांकाचा शत्रू आहे त्याला सागरावरून नष्ट केले पाहिजे हीच भावना त्यांच्यात तेवत होती. सिद्दी मिस्त्री हा सिद्दी संबुळचा जावई परंतु त्याने सुद्धा कधी आपल्या मनात नात्याची ओढ निर्माण होऊन दिली नाही. जात, धर्म, नाते हे सर्व बाजूला ठेऊन पराक्रमी मुस्लिम अधिकारी सिद्दीशी लढत होते.

इंग्रज, डच व पोर्तुगीज हे निष्णात दर्यावर्दी, पण त्यांनीही मराठा आरमाराची आणि आरमाराचा प्रमुख दौलतखान याची धास्ती घेतली होती. दौलतखानाच्या भीतीने धास्तावलेला एक इंग्रज प्रमुख लिहितो, "शिवाजीचा आरमारी सेनापती दौलतखान काही गुराबा व आाठ-दहा शिबाडे, शिडाची ताडवे घेऊन येत आहे असे कळले तरी त्याचे आरमार येताना दिसताच शिडे उभारून एकदम बंदरात जावे."[१३] दौलतखानाच्या पराक्रमापुढे ज्यांची दाळ शिजली नाही, असे इंग्रज अधिकारी दौलतखान म्हणजे आपल्या रस्त्यातील काटा असे समजत असत. दौलतखानाचा पराभव म्हणजे त्यांच्या आनंदाला उधाण ! २४ जुलै १६७८ च्या पत्रात कॅप्टन अंडर्स्टन मुंबईला कळवितो, "पोर्तुगीजांनी दौलतखानाचा समाचार घेतला हे बरे झाले. ही बातमी खरी असेल तर दौलतखानाचा उद्देश सिद्धीस खास जाणार नाही."[१४]

अत्यंत दूरदृष्टीने शिवाजी महाराजांनी उभारलेल्या आरमाराने पोर्तुगीज, इंग्रज, डच, फ्रेंच व सिद्दी यांच्या विस्तारवादी महत्त्वाकांक्षेवर पाणी फिरविले. परकीय शक्तींना आपल्या भूमीत हस्तक्षेप करू न देता त्यांना थोपवून धरण्याचे महत्त्वाचे कार्य स्वराज्याच्या आरमाराने केले. अनेक अडचणींना सामोरे जात इंग्रज, सिद्दी यांच्याशी लढून शेवटी खांदेरी बेटावर शिवाजी महाराजांनी आपला नाविक तळ उभा केलाच. खांदेरीचा किल्ला अशा ठिकाणी बांधला की, मुंबईहून सुटून जाणारे येणारे कोणतेही गलबत त्यांच्या तोफेच्या पल्ल्यातून सुटून जाणार नाही. "मराठा आरमाराची दौलतखानाने एवढी दहशत बसविली की, आपली जहाजे सुरक्षित जावीत म्हणून इंग्रज, पांर्तुगीज व्यापारी शिवाजी महाराजांना वार्षिक खंडणी देऊ लागले."[१५] शिवाजी महाराजांच्या आरमाराने राजापूर, दाभोळ, वेंगुर्ले, खारेपाटण, चौल, बसनूर, गोलवा, मालवण, गोकर्ण एवढा मोठा विस्तृत सागरी पट्टा आपल्या वर्चस्वाखाली आणला होता. त्यामुळे साहजिकच समुद्रावर सत्ता करणाऱ्या इंग्रज, फ्रेंच, डच, पोर्तुगीज आदी सर्वांना मराठा आरमाराची मोठी दहशत वाटत होती. एका डच व्यापाऱ्याने लिहिले आहे, "शिवाजी जवळ गलबतांची संख्या भरपूर असल्यामुळे तो रात्री सहज छापा घालून गलबत घेईल, म्हणून जमिनीपेक्षा पाण्यावरच त्याचे भय अधिक बाळगले पाहिजे..."[१६] अशाच प्रकारची भीती पोर्तुगीजांनी सुद्धा घेतली होती, हे २२ जानेवारी १६६८ च्या सुतकरांच्या पत्रावरून दिसते. "गोव्याच्या व्हाईसरॉयला व त्याचे आरमाराला न जुमानता त्याने १३०० कैदी आपल्याबरोबर नेले. याचा निकाल काय लागेल ते अजून समजले नाही. परंतु हे भांडण लवकर मिटले नाही तर समुद्रावर आणि जमिनीवर दोन्ही ठिकाणी शिवाजीपुढे पोर्तुगीजांचा टिकाव लागणार नाही."[१७]

## निष्कर्ष

शिवाजी महाराजांनी आरमारात निष्ठावान सैनिकांची नियुक्ती करून त्यांच्याकडून शत्रू सत्तांवर मराठा आरमाराची दहशत निर्माण केली. सर्व सत्ता मराठा आरमाराला आणि सुभेदारांना किती घाबरत होत्या हे वरील संदर्भावरून दिसून येते. स्वराज्याच्या आरमारात अधिकारी असलेल्या दौलतखान, दर्यासारंग, इब्राहिमखान, सिद्दी मिस्त्री इ. अनेक मुस्लिम अधिकाऱ्यांच्या पराक्रमामुळे मराठा आरमाराचे नाव अनेकांच्या तोंडी झाले. त्यांच्यामुळेच कुणी साहसी मराठा आरमाराच्या विरोधात जात नव्हते अनेक सागरी मोहिमांत या मुस्लिम अधिकाऱ्यांनी पराक्रम करून विजयश्री खेचून आणली होती.

सिद्दी संबूळ हा शिवाजी महाराजांचा शत्रू होता. खांदेरीच्या लढ्यात तो इंग्रजांच्या मदतीला आला होता. तसेच अनेक वेळा तो शिवाजीच्या आरमाराविरूद्ध लढला होता. जंजिऱ्यावर दौलतखानाने अनेकदा स्वाऱ्या करून त्याला नरम केले होते. असा हा स्वराज्याचा शत्रू आणि याचाच जावाई सिद्दी मिस्त्री हा मराठा आरमारात एक उच्चपदस्थ अधिकारी होता. शिवाजीच्या मृत्युनंतरही तो स्वराज्यात संभाजीच्या काळात आरमाराचा अधिकारी होता. शिवाजीच्या वेळी मराठा आरमारात अधिकारी असलेला सुलतानखान शिवाजी महाराजांच्या मृत्युनंतर संभाजीच्या कारकिर्दीत आरमाराचा सुभेदार झाला, तसेच शिवाजीच्या वेळी आरमारात सैनिक असलेला दाऊतखान

पुढे आपल्या पराक्रमाने सुलतानखानानंतर आरमाराचा सुभेदार बनला. याच बरोबर अनेक मुसलमान आरमारात स्वराज्य सेवा बजावित होते.

"आरमारातील तोफखान्यात तोफा डागणारे गोलंदाज हे मुस्लिम असत."[१८] मराठा आरमारात कोळी, भंडारी आणि जास्त संख्येने मुस्लिम यांचाच भरणा होता. परंतु कधीही यांच्यात वाद निर्माण झाले नाही. हिंदू आणि मुसलमान एकाच राज्यात, एकाच सैन्यात आणि एकाच जहाजावर राहून सुद्धा धार्मिक मतभेद किंवा जातीय दंगे झालेले शिवकाळात आढळत नाही. शिवाजी महाराजांची मुस्लिमांना असलेली वागणूक ही मानवीच होती, ती धार्मिक नव्हती किंवा धर्माकडे पाहून नव्हती त्यामुळे त्यांच्यात दुजाभाव, शिवाजी आणि हिंदू सैनिकांबद्दल निर्माण झाला नाही. त्यांनी आपल्या जीवाची पर्वा न करता मराठा राज्याच्या सेवेला वाहून घेतले होते. कारण स्वराज्याची सेवा आणि सुराज्याची निर्मिती ही ध्येय बाळगण्याची क्षमता शिवाजी महाराजांनी त्यांच्यात निर्माण केली होती. त्यामुळे त्यांना या व्यतिरिक्त दुसरे काहीही दिसत नव्हते. म्हणूनच त्यांच्या राष्ट्रकार्यात धर्म किंवा नाते आड आले नाही.

मराठी आरमाराच्या यशाचे श्रेय शिवाजी महाराजांच्या अचाट कल्पकतेला, दूरदर्शीपणाला आणि मराठी आरमारात अधिकारी असणाऱ्या दौलतखान, दर्यासारंग, सिद्दी मिस्त्री, इब्राहिमखान, मायनाक भंडारी, सुलतानखान, दाऊतखान मुस्लिमांना तसेच त्यांच्या शूर सहकाऱ्यांच्या पराक्रमाला देता येईल.

**संदर्भ :-**


१) कुळकर्णी, भिमराव (संपा.), ***कृष्णाजी अनंत सभासद विरचीत छत्रपती श्री शिवाजी महाराजांचे आद्यचरित्र***, अनमोल प्रकाशन, पुणे, १९८७, पृ. ६१.
२) साने, का.ना (संपा.), ***मल्हार रामराव चिटणीस विरचीत शिवछत्रपती महाराज यांचे सप्तप्रकरणात्मक चरित्र***, काव्यतिहास संग्रह, पुणे, १८८९, पृ. १४१, १४२.
३) Sen, Surendranath, ***The Military system of the Maratha's,*** Orient Longman Pvt. Ltd., Culcutta, 1958, p. 17.
४) Sen, Surendranath, ***Administrative System of the Maratha's,*** University of Culcutta, 1925, p. 95.
५) Sen, Surendranath, ***The Military system of the Maratha's,*** पूर्वोक्त, p. 18.
६) तत्रैव, पृ. १९.
७) हनवते, प्रेम, ***शिवरायांचे निष्ठावंत मुस्लिम सैनिक***, सुधीर प्रकाशन, वर्धा, १९९४, पृ. ७६-७७.
८) तत्रैव, पृ. ७८.
९) Pagadi, Setu Madhavrao, ***Chatrapati Shivaji***, Continental Publication, Pune, 1974, p. 124.
१०) तत्रैव, पृ. १६९.
११) तत्रैव, पृ. १७५.
१२) शेजवलकर, त्र्यं.शं., ***श्री शिवछत्रपती***, मराठा मंदिर प्रकाशन, मुंबई, १९६४, पृ. २८८.
१३) सरदेसाई, गो.स., ***शककर्ता शिवाजी***, फोएनिक्स पब्लिकेशन, मुंबई, १९३५, पृ. २५२.
१४) केळकर, न.चि., आपटे, द.वि. (संपा.), ***शिवकालीन पत्रसार संग्रह***, खंड १ (शके १४८८ ते १६०४), शिवचरित्र कार्यालय, पुणे, १९३०, संग्रह क्रमांक २०५६.
१५) तत्रैव, संग्रह क्रमांक २२९८.
१६) तत्रैव, संग्रह क्रमांक १६६४.
१७) तत्रैव, संग्रह क्रमांक ११९२.
१८) अमिन सैय्यद, ***महापुरुष शिवाजी महाराज***, पृ. १७४.